

# दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका

Scanned by CamScanner

# दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका

(मराठी त्रैमासिक)

ऑक्टोंबर / नोव्हेंबर / डिसेंबर/२०१२

वर्ष : ३० * अंक ४ था

संपादक : चंद्रकुमार नलगे

मुद्रक : गणेश प्रिंटर्स, कोल्हापूर, फोन : २६९५५४५

मुखपृष्ठ : विजय टिपुगडे

मूल्य : रुपये ४०

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृतीमंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ, राज्य शासन सहमत असेलच असे नाही.
- या अंकाला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अनुदान प्राप्त.

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका

## लेख


| | | |
|---|---|---|
| १) कामगारांच्या वेदनेचा वेध घेणारा महाकवी | प्रा. सुभाष ग. जाधव | १ |
| २) मराठी बालसाहित्य: निर्मिती आणि वाटचाल | श्याम कुरळे | ८ |
| ३) तेंडुलकरांच्या नाटकांतील स्त्री व्यक्तिरेखा | प्रा. सुहासकुमार वा. बोबडे | १८ |
| ४) प्रा. दादासाहेब मोरेंच्या कादंबऱ्याचा परीघ | सतेज दणाणे | २७ |
| ५) माझी कंडक्टरी | प्रा. वि. द. कदम | ३४ |
| ६) धर्म-अधर्माचा लेखाजोखा म्हणजे 'पाच आऱ्याचं चाक!' | नरेंद्र नाईक | ३७ |
| ७) मराठीतील अद्भुतरम्य कादंबरीची स्वरूप, वैशिष्ट्ये | प्रा. जालंदर आ. पाटील | ४४ |
| ८) एका वाचकाचे पत्र | डॉ. सुरेश उपळावीकर | ५३ |
| ९) स्त्रीवादी समीक्षा | डॉ. सविता घाटगे | ६१ |
| १०) गो. वि. करंदीकरांच्या लघुनिबंधातून प्रकट होणारे कोकणातील भावविश्व | प्रा. आर. डी. कांबळे | ६७ |


## कथा


| | | |
|---|---|---|
| टिंगाणी | रंगराव बापू पाटील | ८१ |


## कविता


| | | |
|---|---|---|
| १) एकसष्ठ | चंद्रकांत बाबर | ९३ |
| २) वारीची पाऊलवाट | विलास माळी | ९४ |


Scanned by CamScanner

# कामगारांच्या वेदनेचा वेध घेणारा महाकवी

प्रा. सुभाष ग. जाधव

मराठी साहित्यात कामगारांच्या जीवनाचे चित्रण करणारा कवी म्हणून नारायण सुर्वे यांच्याकडे पाहिले जाते. तसे पाहणे साहजिकच आहे. कारण खऱ्या अर्थानं कामगारांचे जीवन जगणारा, त्यांची सुख-दु:खे जाणणारा, मार्क्सवादाने प्रेरित होणारा आणि चळवळ करुन न्यायासाठी झगडणारा असा हा कवी आहे. या कवीच्या लेखनाचा परामर्श घेण्यापूर्वी त्यांचे जीवनमान समजून घेणे महत्त्वाचे आहे. कारण कामगार चाळीत राहून, वाट्याला येईल ते काम करत शिक्षण घेत आपल्या जीवनाची वाटचाल करणारा असा हा वेगळ्या वाटेवरील कवी आहे. म्हणूनच कामगारांच्या वेदनेला वाचा फोडणारा मार्क्सवादी महाकवी असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

कवी नारायण सुर्वे यांच्या जन्माविषयीची सत्य माहिती उपलब्ध नाही. एका रस्त्याच्या कडेला गंगाराम या कामगाराला एक लहान बाळ दिसलं आणि ते त्यांनी उचलून घरी आणलं. त्याला नाव दिलं नारायण गंगाराम सुर्वे. त्यामुळे सुर्वेंची जात, धर्म काय आहे हे कोणालाही माहित नाही. जेव्हा त्यांना कळू लागले तेव्हापासून त्यांनी विविध प्रकारची कामे केली. कारण घरी गरिबी होती.

इ.स. १९५७·मध्ये सुर्वे व्हर्नाक्युलर फायनल परीक्षा उत्तीर्ण झाले आणि इ.स. १९५९ मध्ये ते शिक्षक या पदावर रुजू झाले. शिक्षकाचा कार्यभार हा महापालिकेच्या शाळा नंबर एक मध्ये स्वीकारला आणि तेव्हापासून गिरणी कामगार चाळीत शिकलेला हा पोर गिरणगावाचा 'सुर्वे मास्तर' म्हणून परिचीत झाला. शिक्षक झाल्यानंतर सुर्वेनी पहिली कविता इ.स. १९५८ मध्ये 'नवयुग' या मासिकातून प्रसिध्द झाली. त्यांच्या लेखनाची सुरुवात मासिकातील या कवितेपासून झाली आणि आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी कविता लिहिली. गायली आणि वाचली. सुर्वेनी अनेक कविता संग्रह लिहिले आहेत. जसे की 'ऐसा गा मी ब्रह्म' (१९६२), माझे विद्यापीठ (१९६६), जाहीरनामा (१९७५), गाणी चळवळीची(संपा)१९९१, दलित काव्यदर्शन (१९९२),



Scanned by CamScanner

गवसलेल्या कविता(१९९५) नव्या माणसाचे आगमन(१९९५) इत्यादी कवितासंग्रह होय.

वरील कवितासंग्रहाचा विचार करता यात विविध विषयावरील कविता दिसतात. पती-पत्नी मधील प्रेम, चळवळ, कामगार विश्व इ. असे विषय होत येत असले तरी प्रामुख्याने त्यांना कामगारांचे विश्व साकारणारा कामगार कवी म्हणूनच प्रसिध्दी मिळाली. याचे कारणही तसेच आहे. कारण कामगारांचे जीवन काय असतं हे त्यांनी पाहिलं, अनुभवलं आणि भोगलं आहे. ज्यावेळी एखादा लेखक साहित्यकृती लिहितो त्यावेळी त्याने खूप काही भोगलेले, सहन केलेले असते. ती सोशिकता त्याला शब्दांचे सामर्थ्य देते आणि त्याच तीव्रतेने तो लेखन करतो. हे केलेले लेखन माणसांना भावते. आणि ती त्याची एक ओळख होऊन जाते. उदा. निसर्गकवी म्हणताच बालकवी आठवतात. सामाजिक कविता म्हटलं की कुसुमाग्रज आठवतात इत्यादी. याच पध्दतीने सुर्व्यांची ओळख होत गेली आणि साहित्याच्या क्षेत्रात चळवळ करणारा कामगारांच्या व्यथा, वेदना मांडणारा, कामगारांच्या कविता लिहिणारा कवी म्हणून सुर्वे मराठी साहित्य क्षेत्रात परिचित झाले.

प्रत्येक माणूस हा आयुष्यभर कष्ट करतो. कष्ट करताना स्वत:वर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी चळवळ उभी करतो. यातून तो चळवळीची गीत रचतो आणि गातो. आपल्या न्यायासाठी तो संघर्ष उभा करतो. या संघर्षाचे चित्रण आपणास सुर्वेच्या कवितेतून दिसते. हा संघर्ष आजचा नाही तर अनेक वर्षापासून चालत आलेला आहे. तो थांबलेला नाही आणि भविष्यातही तो दिसणार आहे. कामगारांचे आर्थिक, सामाजिक, मानसिक शोषण नेहमीच होते आहे. या शोषणाला आळा घालण्यासाठी आणि आपल्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी तो क्रांतीची चळवळ उभी करतो आहे. ही चळवळ कशी उभी राहते आहे याचे प्रत्यंतर नारायण सुर्वेच्या पहिल्याच कविता संग्रहातून आपणास दिसून येते. स्वत: एका कामगार चाळीत वाढलेल्या, संस्कारित झालेल्या आणि त्यांच्यातून स्फुर्ती घेऊन कविता लिहिणारा कवी नारायण सुर्वे म्हणतो-

"कामगार आहे मी तळपती तलवार आहे.
सारस्वतांनो! थोडासा गुन्हा करणार आहे."

(ऐसा गा मी ब्रम्ह)

नारायण सुर्वे हे कामगारांच्या व्यथा-वेदना, आशा-आकांक्षा जाणणार



Scanned by CamScanner

आहेत. बकाल अंधारातून जीवन जगत प्रकाशाकडे वाटचाल करणारे, जिद्दीने संघर्ष करणारे असे हे कवी आहेत. म्हणून कामगारांचे जीवन जगत आलेल्या कविच्या कवितेतील कामगारांच्या जगाचा संदर्भ अभ्यासकांना बाजूला ठेवता येत नाही. आपण कामगार असलो तरी आपणास काही स्वातंत्र्य विचार आहेत. हे कवी कवितेतून सांगू पाहतो आणि स्वत: चळवळीच्या माध्यमातून न्यायासाठी आपण वारंवार गुन्हा करणार असल्याचे मार्मिकपणे सांगतो.

हा कामगार त्यांना खऱ्या अर्थाने भावतो. कारण कामगारांच्या समस्या सोडवण्याचे खरे सामर्थ्य मार्क्सवादात आहे. कवीची विचारसरणी ही मार्क्सवादी असल्याने त्यांनी साहित्याच्या माध्यमातून संघर्ष उभा केला. हा संघर्ष उभा करत असताना त्यांना कोणाची साथ मिळाली नाही. त्यांनी स्वत: ची वाट स्वत:च निर्माण केली. आपण एकटे आहोत हे त्यांना मरेपर्यंत सलत राहिले. म्हणूनच ते एकटेपणाची भावना मांडताना लिहितात,

"ना घर होते, ना गणगोत, चालेन तेवढी पायाखालची जमीन होती
दुकानांचे अडोसे होते, मोफत नगरपालिकेची फूटपाथ खुलीच होती."
(माझे विद्यापीठ)

असे स्वत:चे एकटेपण कवी काव्यातून मांडतो. वरील कवितेच्या ओळीमध्ये कवी जरी एकटा असला तरी पालन पोषण करणारे त्याचे आईवडील त्याला सोबत होते. पण जन्मदाते आईवडील कोण? हे त्यांना मरेपर्यंत एकटेपणाची जाणीव करुन देत राहिले.

कामगारांच्या समस्यांना वाचा फोडली ती मार्क्सवादाने. समाजात सामाजिक, आर्थिक, मानसिक समानता निर्माण झाली पाहिजे. कामगारांचे शोषण थांबले पाहिजे असा विचार मार्क्सवादातून पुढे येत होता. हाच मार्क्सवादी विचार नारायण सुर्वेंच्या कार्याची प्रेरणा होती. हा मार्क्सवाद त्यांना कसा भेटला हेही त्यांनी कवितेतून सांगितले आहे. ते म्हणतात-

"माझ्या पहिल्या संपातच
मार्क्स मला असा भेटला,
मिरवणुकीच्या मध्यभागी
माझ्या खांद्यावर त्याचा बॅनर होता
जानकी अक्का म्हणाली, वळिखलंस ह्याला-
ह्यो आमचा मार्क्सबाबा



Scanned by CamScanner

-------------"

(कार्लमार्क्स-जाहिरनामा)

येथे नारायण सुर्वेनी जी एक स्वतःच्या मनातील प्रतिमा आहे ती स्पष्ट केली आहे. कामगारांचे जीवन जगत असताना मार्क्सवादाशिवाय पर्याय नाही याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच ते येथे मार्क्सवादाचा उल्लेख करतात. हा मार्क्सवाद आपणास कसा प्रेरणा देतो हे नारायण सुर्वे 'जाहिरनामा'मध्ये सांगतात. हा मार्क्सवाद सुर्वेना आत्मपरिक्षण करून धाडसाने, डोळसपणे पुढे जाण्यास सांगतो. कार्लमार्क्सच्या विचाराने जीवन जगणारे सुर्वे आयुष्याने काय शिकविले हे जाहिरनामामध्ये सांगतात. ते म्हणतात -

"अगोदर भाकरीसाठी खटपट कर नंतर वेळ फावलाच
तर कविता वाच असे आयुष्याने शिकविले आहे."

माणसाला जगायला प्रथम भाकरी लागते आणि नंतर बाकीच्या सर्व गोष्टी असतात. हे येथे सुर्वे प्रकर्षाने मांडताना दिसतात.

कामगाराला भाकरी मिळविणे किती कठीण आहे याची जाणीव त्यांना आहे. त्या भाकरीचा प्रश्न त्यांना नेहमीच भेडसावत होता. म्हणूनच ते भाकरी मिळविण्यासाठी आपल्या मनात प्रश्न कसे निर्माण होतात आणि त्यासाठी आपण कसे गुन्हे करणार आहोत हेही मार्मिक शब्दात मांडले आहे. ते म्हणतात -

"रोजीचा रोटीचा सवाल रोजचाच आहे.
कधी फाटका बाहेर कधी फाटका आत आहे.
कामगार आहे मी तळपती तलवार आहे.
सारस्वतांनो! थोडासा गुन्हा करणार आहे."

(चार शब्द-जाहिरनामा)

ही रोजी रोटी मिळविणे प्रत्येकालाच अवघड असते. सुर्वे हे मार्क्सवादाने प्रेरीत झालेले असल्याने कोणासमोर मान खाली करणे हे त्यांना मान्य नाही. अभिमानानेच जगणे त्यांना मान्य आहे. हेही त्यांनी 'स्वतःलाच रचीत गेलो.' या कवितेतून मांडले आहे. आपण आयुष्यात कसे घडत गेलो हेही कवी सांगतो. 'माझे विद्यापीठ' या कवितेतून स्वतःची जडणघडण कशी होत गेली हे ते मार्मिकपणे मांडतात. ते असे -



Scanned by CamScanner

"कळू आले तेव्हापासून डबा घेऊन साच्यावर गेलो
घडवतो लोहार हातोड्याला तसाच घडवला गेलो
शिकलो तार कसी लावावी बाबीन कशी भरावी धोट्यात
वेळ आलीच तर हक्कासाठी केव्हा करावी आऱ्यांखालात"

सुर्वेनी स्वत:ला स्वत:च घडविले. ते स्वत: सूतगिरणीत काम करतात आणि कामगारांचे जीवन काय आहे याचे त्यांनी येथे अधिक भयावह दर्शन घडविले आहे. याचे चित्रणही ते 'गिरणीची लावणी' या कवितेतून करतात. ते म्हणतात-

"सात वाजता सकाळी। भोंगा वाजवी भूपाळी।।
सुरु होते पहिली पाळी। मोठ्या डौलात।।
चक्र फिरे गरागरा। सुत निघे भराभरा।।
नटवाया वसुंधरा। आमच्या घामातून।।"

(गिरणीची लावणी- ऐसा गा मी ब्रह्म)

या ठिकाणी गिरणीमध्ये सकाळी, रात्री असे पाळीपाळीने कामगार काम करतो. पृथ्वीवरील लोकांना नटविण्यासाठी तेथे वस्त्र तयार होते. एकूणच कपडा एकेक तार जुळवून तयार होतो. कामगारांच्या घामाची ती कहाणी असते. यातून सप्तरंगी इंद्रधनुष्याच्या रंगाची वस्त्रं निघतात. ती सर्व लोक परिधान करुन आनंदोत्सव साजरा करतात. मात्र कामगारांचे जीवन त्यांना कधीच कळत नाही. गिरणीतच त्यांचे आयुष्य संपते जसे की सुर्वेचे आई वडील गेले. हेही दु:ख सुर्वे माझी आई या काव्यातून मांडतात. ही त्यांची पालनकर्ती आई जेव्हा या जगातून काम करतानाच मृत्युमुखी पडते तेव्हा त्यांना अपार दु:ख होते. हे दु:ख कवी या कवितेच्या शेवटच्या कडव्यात मांडतो. एकाच कवितेत कवी आई कशी आहे ते सांगतो आणि शेवटी आई निघून गेल्याचं दु:खही मांडतो. त्यांच्या आईवडीलांचे कामगार म्हणून त्यांनी जगलेले जीवन सुर्वेनी पाहिले आहे. तेच त्यांनी कवितेच्या माध्यमातून मांडले.

सुर्वे यांनी इ.स. १९९१ पूर्वी काव्यलेखन केले आहे आणि १९९० नंतरही केले आहे. म्हणजे या कवीच्या कविता या दोन्ही कालखंडात लिहिलेल्या दिसतात. १९९० पूर्वी ज्या पध्दतीने कवी कविता लिहितो. त्याच पध्दतीने १९९० नंतर लिहिताना दिसते. जसे की 'नव्या माणसाचे आगमन'(१९९५)



Scanned by CamScanner

'गाणी चळवळीची' (संपा,१९९१) 'दलित काव्यदर्शन'(संपा,१९९२) 'कविता श्रमाची'(संपा, १९९२), गवससलेल्या कविता'(१९९५) इ. या कवितासंग्रहांमध्ये कामगारांचे चित्रण करणाऱ्या कविता आपणास दिसून येतात. सुर्वेंनी कविता लेखनास सुरुवात केल्यापासून ते मृत्यूपर्यंत त्यांनी कामगारांचे जीवन कवितेतून मांडण्याचा प्रयत्न केला. १६ ऑगस्ट २०१० रोजी या महान कवीचा मृत्यू झाला.

सुर्वे यांच्या कवितेचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांची कविता परंपरेच्या साच्यातून न मांडता स्वत:च्या शैलीने मांडली आहे. म्हणूनच ती वेगळी ठरते. त्यांची कविता परंपरेला बळी पडणारी नसल्याने आपल्या मनावर अधिराज्य गाजवते. कवितेतील नायक हा शोषणग्रस्त कामगार आहे हा त्यांच्या कवितेचा केंद्रबिंदू आहे. सुर्वे कोणतीही विशिष्ट भूमिका घेऊन काव्यरचना करीत नाहीत. कारण त्यांच्या मते प्रत्येक शब्द हा भूमिका घेऊन जन्मलेला असतो. त्यामुळे भूमिका घेऊन लेखक लिहितो असे म्हणणे त्यांना संयुक्तिक वाटत नाही. माणसाविषयी आणि माणसासाठीच लिहिणे ही भूमिका ते विसरत नाहीत. आपल्या भूमिकेविषयी ते म्हणतात, 'कोट्यावधी लोकांपासून स्वत:ची नाळ कापून मी अलग होऊ इच्छित नाही. हेच लोक माझ्या रचनेचे विषय आहेत. स्वत: जगताना जे बरेवाईट अनुभव येतात त्यांचा सजीव अविष्कार, त्यातील संघर्ष, वैश्विक अनुभव यांचे जर जिवंत, कलात्मक आणि यथार्थपणे चित्रण मला करता आले तरी पुष्कळच झाले. म्हणूनच संघर्ष करीत, पाय घट्ट रोवून उभा राहा 'भागो नही बदलो' असे अनुभवानेच मला शिकवले आहे. माझी भूमिकाच सांगायची झाली तर ही नाही तरी उगीच फालतू वटवट करण्यात अर्थ तरी काय?' (जाहिरनामा पृ.५०) अशी भूमिका मांडून ते स्वत: कवितेशी कशा पध्दतीने सुसंवाद साधतात याचीही नोंद करतात. ते लिहितात, "कवितेत मी माझ्याशी संवाद करतो. भांडण करतो, सांत्वन करतो, स्वत:ला मोकळा करतो आता हे सगळे अवघड आहे, कठीण आहे. मीही कातावतो, पण खरे समाधानही मला इथेच मिळते."

(जाहिरनामा-पृ.५५) या पध्दतीने नारायण सुर्वेनी आपल्या कविता लेखनाविषयी मते नोंदविली आहेत. एकूणच यावरुन माणसात रमणारा, माणसांशी जीव लावणारा आणि माणसाला माणसासारखं जगता यावं यासाठी झगडणारा



Scanned by CamScanner

कवी म्हणून आपल्या मनावर अधिराज्य गाजवतो.

नारायण सुर्वेनी कामगारांचे जीवन स्वतः अनुभवले त्यामुळे त्यांना कविता मांडणी करताना प्रतिमा सहज सुचतात. हे त्यांनी स्वतःच 'जाहिरनामा' या कवितासंग्रहात सांगितले आहे. प्रतिमाबरोबरच त्यांनी कविता रचताना लयत्वाचा फारसा विचार केला नाही. कारण त्यांना कामगारांच्या जीवनाचं वास्तव मांडायचे होते. एकूणच सुर्वेच्या काव्याचा विचार करता येथे आपणास कामगारांच्या वेदनेचा वेध घेणारा महाकवी ही दिलेली बिरुदावली योग्य आणि संयुक्तिक आहे असे म्हणणे न्यायाचे ठरते.

संदर्भ -


१) सुर्वे नारायण - माझे विद्यापीठ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती सप्टेंबर, १९६६.

२) सुर्वे नारायण - जाहिरनामा, प्रकाशक-रामदास भटकळ, पॉप्युलर प्रकाशन ३५ सी.पं. मदनमोहन मालवीय मार्ग, मुंबई ४०००३४. प्रथमावृत्ती १९६५ पुनर्मुद्रण १९८९.

३) सुर्वे नारायण - ऐसा गा मी ब्रह्म.

४) सुर्वे नारायण - (संपा)- कविता श्रमाची, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, प्रकाशन दुसरे, पहिली आवृत्ती, फेब्रुवारी १९९३

५) सुर्वे नारायण (संपा)- गाणी चळवळीची, प्रकाशक-लोकवाङ्मयगृह प्रकाशन. पहिली आवृत्ती ऑक्टोबर १९९१ तिसरी आवृत्ती फेब्रुवारी २०००.

६) शिरवाडकर वसंत (संपादन) - सर्व सुर्वे, प्रकाशक- सौ. नम्रता मुळे, डिंपल पब्लिकेशन.


◆◆



Scanned by CamScanner